जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - २९० दिनांक - १७/०७/२०२४

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# खुनाचे गुन्ह्यातील १२ आरोपींना जन्पठेप व ५ लाख रूपये दंड

हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं ५३७/२०१४ भा.दं.वि.कलम ३०२,१४३,१४७,१४८,१४९,२०१, ३५२,१२०(ब) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(i), ३(१)(ii), ३(२), ३(४),४ मधिल मयत इसम सचिन शहाजी शेलार याची काळेपडळ परिसरात सामाजीक कार्य करीत असताना लोकप्रियता वाढत असल्याने आरोपी यांनी संगनमत करून दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने दि.२७/०९/२०१४ रोजी काळेबोराटेनगर सुपर मार्केटजवळ खुन केल्याने गुन्हा दाखल होता.

मा.विशेष जिल्हा व सत्र न्यायाधिश, शिवाजीनगर सत्र न्यायालय पुणे.श्री.पी.पी.जाधव यांचे न्यायालयात दाखल गुन्ह्याची नियमीत सुनावणी चालु होती. दि. १६/०७/२०२४ रोजी मा. न्यायालयाने आरोपी नामे **१)अमित अर्जुन फल्ले रा. ओमकार कॉलनी काळेपडळ हडपसर पुणे २) अनिल तुकाराम सोमवंशी रा. सदर ३) अनिल सुभाष राख रा.काळेबोराटे नगर हडपसर ४) धनाजी आनंदा वनांगडे रा. सातवनगर हांडेवाडी रोड, हडपसर पुणे. ५) आशुतोष ऊर्फ पिंक्या अशोक बुट्टे पाटील रा. ऊरूळी कांचन पुणे. ६) गणेश रामान्नु चव्हाण रा. काळेपडळ हडपसर पुणे. ७) धिरज अनिल ढगरे रा. ससाणेनगर हडपसर पुणे. ८) अनिल बापु माने रा. काळेपडळ हडपसर पुणे. ९) राजेंद्र रावसाहेब कांबळे रा. वैदुवाडी, हडपसर पुणे. १०) अमित चंद्रकांत घाडगे रा. शेवाळवाडी फाटा मांजरी पुणे. ११) जग्गनाथ ऊर्फ जग्गु केरबा चौगुले रा. सातवनगर हांडेवाडी रोड, हडपसर पुणे. १२) बाबासाहेब भगवान हरणे रा. कामठे वस्ती माळवाडी हडपसर पुणे** यांना दोषी ठरवून जन्पठेपेची शिक्षा तसेच प्रत्येकी ५ लाख रूपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष साधा कारवास अशी शिक्षा सुनावली आहे.

दाखल गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहा.पोलीस आयुक्त श्री.राजन भोगले यांनी केला होता. यामध्ये विशेष सरकारी वकिल श्रीमती उज्वला पवार यांनी सुरवातीपासुन केसचे कामकाज पाहीले होते.

केसचे कामकाज मा.पोलीस उप आयुक्त परि-५ श्री. आर राजा,मा.सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग श्रीमती अश्विनी राख यांचे मार्गदर्शनाखाली हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संतोष पांढरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती मंगल मोढवे श्री.उमेश गित्ते, यांचे सुचनां प्रमाणे पोलीस अंमलदार, अविनाश गोसावी, राजु कांबळे, संभाजी म्हांगरे यांनी काम पाहीले आहे.